REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख २६ जानेवारी, १९३८ अंक ४



एच. एच. दि छत्रपति महाराजा
ऑफ कोल्हापूर यांचे आश्रयाखालील
जाधव कॉलेज ऑफ
टेलरिंग ॲन्ड कटिंग
जानेवारीपासून नवीन वर्ग सुरू होणार. नांवें नोंदवा.
नवीन माहितीपत्रक मागवा. ४९७ बुधवार, पुणें.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या
प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग
कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

शिवणकलेचें अनुभविक शिक्षण मिळण्याचें
हिंदुस्थानांत फक्त हें एकच ठिकाण
दि मॉडर्न टेलरिंग इन्स्टिटयूट
डेक्कन जिमखाना, पुणें नं. ४
चालक—एम. एन. पाटसकर, F. C. D. (London)




स्टॉकिस्ट : मा. बो. कुळकर्णी, किराणा मालाचे व्यापारी,
पुष्करणी चौक, पुणें २

न्यू इंडिया ॲशुअरन्स कं. लि. मुंबई
( सर्व तऱ्हेचे विमा काम करणारी हिंदुस्थानांतील सर्वांत मोठी कंपनी. )

आयुर्विमा उतरणारा मनुष्य मुख्यतः खालील तीन गोष्टींकडे लक्ष देतो:—
(१) कंपनीचें स्थैर्य. (२) उत्तम व्यवस्था.
(३) पॉलिसींमधील अटी व बोनस वाटण्याची पात्रता.
"न्यू इंडिया" ह्या तीनहि बाबतींत पूर्ण समाधान देईल.
प्रॉस्पेक्टस मागवा अगर समक्ष भेटा आणि खात्री करून घ्या.

श्री. डी. के. जोगळेकर, बी. ए.,
ऑर्गनायझर ऑफ एजन्सीज.
टिळक रोड, पुणें ( २ )

गव्हाचे पोहे
(REGD.) ( BLOSSOM ) (REGD.)

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

७५३ सदाशिव
पुणें २.
भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे
कारखानदार.

— मनपसंत काम —
वक्तशीर-पणाची ] रिसबूड ब्रदर्स-टेलर्स [ गॅरंटी
सदाशिव हौदानजिक, पुणें.

बँकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत
डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहितीकरितां लिहा.
जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

# विविध माहिती

### फ्रान्सची लोकसंख्या—मंदमतीनें प्रगति

फ्रान्सची लोकसंख्या १९३१ सालीं ४ कोटि, १४ लक्ष होती, ती १९३६ मध्यें ४ कोटि, १५ लक्ष झाली. पांच वर्षांमागें त्या देशांत ८८ लक्ष घरांमध्यें १ कोटि, २९ लक्ष कुटुंबें रहात होतीं. १९३६ सालीं घरांची व कुटुंबांची संख्या अनुक्रमें ९१ लक्ष व १ कोटि, ३१ लक्ष झाली. प्रत्येक फ्रेंच कुटुंबांत सरासरीनें ३ माणसें आहेत आणि दर दीड कुटुंबांत एक घर आहे असा ह्या आकड्यांवरून हिशेब होतो.

### ग्लासगो येथील प्रदर्शन—दोन कोटि प्रेक्षक !

स्कॉटलंडमधील ग्लासगो शहरीं फार मोठ्या प्रमाणावर एक औद्योगिक प्रदर्शन भरवण्यांत येणार आहे. लक्षावधि मुलें व मुली ह्यांनीं तें पहावें अशी व्यवस्था करण्यांत यावयाची आहे. प्रदर्शन येत्या मे महिन्यांत उघडणार आहे तरी आतांच प्रत्येकी १५ रुपये किंमतीचीं एक लक्ष सीझन तिकिटें खपलीं आहेत. दोन कोटि लोक प्रदर्शन पहातील असा अंदाज आहे.

### घरीं आणि दारीं अपघात

कारखान्यांतील अपघातांमुळें गेल्या वर्षीं ग्रेटब्रिटनला १३ कोटि रुपये नुकसान सोसावें लागलें. कारखान्यांत एक अपघात झाला तर घरांतल्या घरांत दहा अपघात होतात असा अंदाज आहे. कारखान्यांतल्या अपघातांपैकीं एक-पंचमांश यंत्रांमुळें होतात; बाकीचे पाय घसरून किंवा अन्य कारणांनीं होतात. अधिकाधिक काळजी घेतली गेल्यामुळें कारखान्यांत होणारे अपघात दिवसानुदिवस टळत आहेत.

### इंग्लंडमध्यें रेडिओ परवाने

इंग्लंडमध्यें दीड कोटि कुटुंबें असतील. त्यांपैकीं निम्म्यांत रेडिओची स्थापना झालेली आढळते. गेल्या वर्षीं सुमारें ८५ लक्ष रेडिओचे परवाने घेतलेले होते. दहा वर्षांमागें ही संख्या २३ लक्ष होती आणि ती हळुहळू वाढत आली आहे. गेल्या तीन वर्षांतला वाढावा मंद गतीचा आहे.

### मुंबई इलाख्यांतील दवाखाने व इस्पितळें

मुंबई इलाख्यांतील दवाखाने व इस्पितळें ह्यांवर मिळून १९३६ सालीं ४८¾ लक्ष रु. खर्च झाले. ह्या रकमेपैकी १८½ लक्ष रु. स्थानिक स्वराज्य संस्थांनीं खर्चिले व प्रांतिक सरकारनें २३¾ लक्ष रु. दिले. एकूण २९ लक्ष लोकांस औषधोपचार करण्यांत आला. स्त्री रोग्यांची संख्या ८६ हजार भरली. १ लक्ष २९ हजार शस्त्रक्रिया करण्यांत आल्या.

### खेडेगांवांतील लोकांकरितां औषधोपचाराची व्यवस्था

खेडेगांवांतील लोकांस वैद्यकीय मदत सुलभतेनें मिळावी, ह्याकरितां मुंबई सरकारनें एक योजना आखली आहे. अहमदाबाद, पश्चिम खानदेश, नाशिक, रत्नागिरी, बेळगांव व कानडा ह्या प्रत्येक जिल्ह्यांत एका खासगी डॉक्टराची दरमहा ५० रु. वेतनावर नेमणूक करण्यांत येईल व त्यास फिरतीकरितां २५ रु. भत्ता मिळेल. दरसाल ४०० रुपयांचीं औषधें त्यास पुरविलीं जातील. ह्या डॉक्टरानें तीन—चार खेड्यांच्या एका गटांत आठवड्यांतील ठराविक दिवशीं औषधोपचार करावयाचे आहेत. ह्या योजनेचा निम्मा खर्च जिल्हा लोकलबोर्डानें करावयाचा असून निम्मा खर्च सरकार सोशील.

### ब्रिटिश अमेरिकन टोबॅको कंपनीचा नफा

ब्रिटिश अमेरिकन टोबॅको कंपनीस गेल्या वर्षीं सुमारें ७ कोटि रुपये नफा झाला. करेराज ह्या सिगारेट्स व तंबाखू विकणाऱ्या मंडळीचा गेल्या सालचा नफा सुमारें पावणेदोन कोटि रुपये होता.

### विदेशी कपाशीची वाढती आयात

हिंदुस्थानांतील कपाशीच्या पिकास गिऱ्हाइक मिळत नाहीं म्हणून ती पडून आहे, परंतु हिंदी गिरण्या अमेरिकन कपाशीची खरेदी वाढत्या प्रमाणावर करीत आहेत. गेल्या तीन वर्षांत मिळून अमेरिकन कपाशीच्या ७५ हजार गाठी हिंदुस्थानांत उतरल्या; सध्या ५३ हजार गाठी हिंदुस्थानच्या वाटेवर आहेत ! जपाननें नोव्हेंबर, १९३७ मध्यें हिंदी कपाशीच्या ९१ हजार गाठी घेतल्या होत्या; गेल्या नोव्हेंबरांत त्या देशाकडे फक्त १,६९५ गाठी निर्गत झाल्या. अशा रीतीनें, हिंदी कपाशीचा चोहोंकडून कोंडमारा होत आहे असें दिसून येईल.

### रेल्वेचें उत्पन्न वाढविण्याकरितां बक्षिसांची योजना

ग्रेटब्रिटनमधील सदर्न रेल्वे आपलें उत्पन्न वाढविण्यासाठी एक बक्षिसांची योजना अंमलांत आणणार आहे. प्रत्येक स्टेशनाच्या अपेक्षित वार्षिक उत्पन्नाचा आकडा जाहीर करण्यांत येईल व त्यापेक्षा ज्यास्त उत्पन्न कोणत्या स्टेशनास होतें ह्याविषयीं चढाओढ लावण्यांत येईल. अपेक्षित रकमेपेक्षा प्रत्यक्ष उत्पन्न शतमानानें किती ज्यास्त झालें, हें पाहून यशस्वी स्टेशनांस चांदीचे पेले व ढाली नजर करण्यांत येतील. उत्पन्न वाढविण्यास सहाय करणाऱ्या रेल्वे नोकरांस रोख बक्षिसें मिळणार आहेत.

### मि. लॉइड जॉर्ज ह्यांच्या विवाहाची ज्युबिली

सुप्रसिद्ध ब्रिटिश मुत्सद्दी मि. लॉइड जॉर्ज ह्यांच्या विवाहाची सुवर्ण ज्युबिली २४ जानेवारी रोजीं साजरी करण्यांत आली. लवकरच, कांहीं महिन्यांनीं, त्यांच्या पार्लमेंटमधील सभासदत्वाच्या सुवर्ण ज्युबिलीचाहि सुप्रसंग येणार आहे. अखंडपणें ५० वर्षें ते पार्लमेंटचे सभासद आहेत. १७ जानेवारी, १८६३ रोजीं त्यांचा जन्म झाला. २४ जानेवारी, १८८८ रोजीं त्यांचा मिस मॅगी ओवेन ह्यांच्याशीं विवाह झाला व त्याच सालीं मि. लॉइड जॉर्ज ह्यांनीं पार्लमेंटांत प्रवेश केला. सतत ५० वर्षें पार्लमेंटचे सभासद असण्याचा मान आजवर कोणासहि प्राप्त झालेला नाहीं.

### हिंदी रेल्वेजचें उत्पन्न

| | रु. |
|---|---|
| १–४–३५ ते १०–१–३६ | ६५,५०,००,००० |
| १–४–३६ ते १०–१–३७ | ६७,८७,००,००० |
| १–४–३७ ते १०–१–३८ | ७१,७८,००,००० |

### ट्रेझरी बिलांवर १ रु. ४ आ. ४ पै. व्याजाचा दर

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत २ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ४ आ. ४ पै. इतका पडला.

### मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

| | किंमत रु. |
|---|---|
| ९-१-३८ ते १५-१-३८ | २५,०८,३५९ |
| १६-१-३८ ते २२-१-३८ | ७५,९८,७४४ |
| २१-९-३१ ते २२-१-३८ | ३,०९,६१,३२,९४७ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती | ३८ |
| २ प्रांतिक विधिमंडळापुढील आर्थिक कार्यक्रम | ३९ |
| ३ ग्वालेरच्या सहकारी परिषदेपुढील कार्य | ४० |
| ४ हिंदी आयुर्विमा कंपन्यांचे संख्येंत वाढ | ४० |
| ५ स्फुट-विचार | ४१ |
| शेतकऱ्यांच्या जमिनीच्या मालकीचें संरक्षण-प्रांतिक अंदाजपत्रकें व रेलवेजचें उत्पन्न-दिल्ली येथील अर्थमंत्र्यांची परिषद्—नव्या दिल्लींत सरकार दप्तराचें ठाणें-स्वदेशी धंदे आणि परराष्ट्रीय व्यापार-बेकारी आणि आर्थिक मंदी—कपाशीच्या उत्पादन खर्चाविषयीं चौकशी | |
| ६ सहकारी चळवळ | ४३ |
| ७ शेतकऱ्यांची आर्थिक सुधारणा | ४४ |
| ८ "शुद्ध-शब्द-कोश" | ४४ |
| ९ हिंदुस्थानचा इटालीशी व्यापार | ४४ |
| १० ग्वालेर येथील मेळा | ४५ |
| ११ " मुद्रण प्रकाश " | ४६ |
| १२ जाधव टेलरिंग कॉलेज | ४६ |
| १३ चांभार विद्यार्थी मंडळ | ४६ |
| १४ निवडक बाजारभाव | ४७ |


# अर्थ

बुधवार, ता. २६ जानेवारी, १९३८

## प्रांतिक विधिमंडळापुढील आर्थिक कार्यक्रम

शेतकऱ्यांच्या दुःस्थितीचें निवारण करण्याकरितां प्रांतिक सरकारनें कोणत्या प्रकारच्या व्यापक योजना आखाव्या, ह्याचें दिग्दर्शन " अर्था " मध्यें आम्हीं मागें केलें आहे. मुंबईच्या प्रधानमंडळानें तशाच मार्गानें पाऊल टाकण्याचें ठरविलें आहे, असें त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या बिलांवरून दिसून येतें. मुख्य प्रधान, श्री. खेर, ह्यांनीं श्रॉफ असोसिएशनच्या सभासदांस उद्देशून केलेल्या भाषणांत मुंबई सरकारच्या कार्यक्रमाबाबत जी माहिती दिली, तीवरून सरकार विचारपूर्वक व दूरदृष्टीनें आपल्या योजना व्यवहारांत आणीत आहे, हें स्पष्ट होतें. सावकारांच्या व्यवहारांवर नियंत्रण, कर्जतहकुबी, कर्ज तडजोड मंडळांची स्थापना इत्यादि गोष्टी सरकारनें आखलेल्या सुधारणेच्या मार्गांतील केवळ टप्पे आहेत, असें त्यांनीं सांगितलें. कर्जाची तडजोड करणारीं मंडळें अस्तित्वांत येण्यापूर्वींच सावकारांनीं आपणांवरील अपेक्षित संकट टाळण्याकरितां शेतकऱ्यांस नागवूं नये, ह्याकरितां अल्प मुदतीपुरती कर्ज तहकुबी जाहीर करणें अपरिहार्य होते, असें ते म्हणाले. सध्याच्या परिस्थितीमध्यें, शेतकऱ्यांचें सावकारांवाचून भागणें शक्य नाहीं, कारण दुसऱ्या कोणत्याच मार्गानें त्यांस कर्ज मिळण्याची आज सोय नाहीं; खेडेगांवांतील जनतेचें सावकारांवरील हें अवलंबन सत्वर दूर होण्यासारखें नाहीं. रिझर्व्ह बँकेन नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आपल्या रिपोर्टांत ही गोष्ट स्पष्ट केली आहे. सावकारांच्या सरळ व्यवहारास आडकाठी न करतां, त्यांचीं देणीं-घेणीं नियंत्रित करावीं म्हणजे नडलेला शेतकरी लुबाडला जाणार नाहीं, अशी मुंबई प्रधानमंडळाची योजना आहे. तीस अनुसरून, सर्व सावकारांस नोंदणीची सक्ती होऊन हिशेब चोख ठेवण्याची त्यांजवर जबाबदारी येईल; त्यांस मिळालेल्या रकमांबद्दल पावत्या द्याव्या लागतील व व्याजाच्या कमाल दरावर नियंत्रण स्वीकारावें लागेल. लायसेन्स नसणाऱ्या सावकारानें कर्जाचा व्यवहार केला, तर त्यास कोर्टाकडून हुकूमनामा मिळणार नाहीं; त्याचा दावाच अजिबात निकालांत निघेल, असें नाहीं; कोर्ट त्यास लायसेन्स घेण्याकरितां मुदत देईल. लायसेन्स फीचें नियोजित दर खाली दिले आहेत.

सावकारीच्या लायसेन्स फीचें कोष्टक

| मागील वर्षांत दिलेलें कर्ज | वार्षिक लायसेन्स पट्टी (रु.) |
|---|---|
| २,००० रु. पर्यंत | १ |
| ५,००० रु. पर्यंत | १० |
| १०,००० रु. पर्यंत | २५ |
| ५०,००० रु. पर्यंत | ५० |
| १,००,००० रु. पर्यंत | १०० |
| १०,००,००० रु. पर्यंत | ५०० |
| १०,००,००० रु. चे वर | १,००० |

वरील पट्टीपासून सरकारास सालिना ३ लक्ष रु. मिळतील अशी अपेक्षा आहे. ह्या उत्पन्नापैकी सुमारें २ लक्ष रुपये सावकारांवरील नियंत्रणाच्या कायद्याची अंमलबजावणी करण्यास खर्च येईल, असा अजमास आहे. प्रत्येक सावकारानें आपल्या कर्जदारांस हिशेब कळविला पाहिजे व मिळालेल्या पैशाबद्दल पावती दिली पाहिजे; त्याचप्रमाणें, कर्जाची सबंद रकम चुकती झाली म्हणजे कुळानें लिहून दिलेल्या कागदपत्रांवर आवश्यक ते शेरे मारले पाहिजेत, असा नियोजित कायद्यानें दंडक घातला आहे. मुंबई प्रांतिक बँकिंग चौकशी कमिटीनें सहामाही हिशेब-पत्रकांची योजना मागेच सुचविली होती; प्रस्तुत कायद्यानें वर्षांतून एकदा पुरे हिशेब देण्याची सावकारांवर सक्ती होणार आहे. धनको व कर्जदार ह्यांमध्यें व्याजाचे दराबाबत कांहींहि करार झाला असला, तरी तारण असलेल्या कर्जावर ९ टक्क्यांपेक्षा ज्यास्त व तारण नसलेल्या कर्जावर १२टक्क्यांपेक्षा ज्यास्त दरानें कर्जदारांस व्याज भरावें लागणार नाहीं. चक्रवाढ व्याज नियोजित कायद्यास संमत नाहीं व दामदुपटीपेक्षा ज्यास्त व्याज घेण्याचा सावकारास त्यानें अधिकार ठेवलेला नाहीं. कर्जावरील व्याजाच्या कमाल दराविषयीं कांहीं मतभेद होण्याचा संभव आहे व प्रांतांप्रांतांत ह्याबाबत एकवाक्यता आढळणें अशक्य आहे. सावकारांवरील निर्बंध प्रभावी ठरल्यास, व्याजाचे वरील दर फार भारी आहेत, असें म्हणतां येणार नाहीं; कारण, खेडेगांवांतील बहुसंख्य सावकारांचें मुद्दल विशेष मोठें नसतें व त्या मुद्दलावर योग्य व्याज सुटलें नाहीं, तर शेतकऱ्यांस कर्ज अजिबात न देण्याकडे त्यांची प्रवृत्ति होण्याचा संभव आहे. शेतकऱ्यांचें हित पहातांना अखेर त्यांत त्यांचें आहित होऊं नये, ह्याविषयीं मुंबईच्या प्रधानमंडळानें योग्य विचार करूनच शेकडा ९ व १२ टक्के हे दर सुचविले असले पाहिजेत. प्रत्यक्ष दिलेल्या कर्जापेक्षा मोठ्या रकमेचा कागद करून घेणारास भारी दंडाची शिक्षा होऊन त्याचा लायसेन्स रद्द होण्याची पाळी येईल, अशी नियंत्रण कायद्यांत तरतूद आहे. वरील सर्व बंधनें न्याय्य व्यवहार करणाऱ्या सावकारांस जाचक होणार नाहींत; फक्त जुलमी सावकारांस मात्र आपली व्यवहारपद्धति सुधारावी लागेल, अशी प्रधानमंडळास आशा वाटत आहे.

सावकारांच्या व्यवहाराचें नियंत्रण, कर्ज तहकुबी व कर्ज तडजोड, एवढ्यावर सरकार थांबणार नाहीं; शेतकऱ्यांच्या उन्नतीकरतां तें आपली पराकाष्ठा करणार आहे, असें श्री. खेर ह्यांनीं आपल्या भाषणांत स्पष्ट सांगितलें. सारा आकारणीच्या पद्-

तींत सुधारणा करण्याचा सरकारचा मानस आहे. ह्या सुधारणेमुळें शेतीचें विभक्तीकरण थांबेल असा विश्वास त्यांनीं प्रकट केला. शेतकी, सहकारी व औद्योगिक खात्यांचें काम एकजुटीनें चालावें, अशी प्रधानमंडळाची मनीषा असल्याचें त्यांनीं सांगितलें. दुय्यम उद्योगधंद्यांची स्थापना, शिक्षणक्रमांत सुधारणा, रस्ते व पाणी ह्यांची सोय, पंचायतींची पुनर्रचना, दारुबंदीची सक्ती, इत्यादि मार्गांनीं शेतकऱ्यांची सर्वांगीण उन्नति घडवून आणण्याचे प्रधान मंडळाचे प्रयत्न चालू आहेत. हे प्रयत्न यशस्वी होऊन त्याचे सुपरिणाम प्रत्यक्ष दिसूं लागण्यास कालावधि होईल हें उघड आहे. आज अनेक वर्षे शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाचा प्रश्न प्रांतिक सरकारापुढे आहे; त्याबाबत कित्येक कमिट्यांनीं वेळोवेळ सूचनाहि केलेल्या आहेत. तथापि, प्रत्यक्ष कार्यास अद्याप नेटानें यत्न करण्यांत आला नव्हता. ही बिकट जबाबदारी सेर मंत्रिमंडळानें आपल्या शिरावर घेतली आहे ती पार पाडण्यास अत्यंत कसोशीनें प्रयत्न करावे लागतील. प्रधान मंडळाच्या योजनांमधील तपशिलांतील किरकोळ मतभेदास गैरवाजवी महत्व न देतां, त्यांच्या कार्यास मदत होईल अशीच भूमिका शेतकऱ्यांचें हित करूं इच्छिणारांनीं घेणें आवश्यक आहे. व्यावहारिक स्वरूपाच्या सूचना व दुरुस्त्या दुसऱ्या कोणांकडून आल्यास सरकारानें त्यांचा योग्य परामर्ष मात्र केला पाहिजे.

## ग्वालेरच्या सहकारी परिषदेचें कार्य

ग्वालेरच्या सहकारी चळवळीच्या इतिहासांत घडून आलेली चिरस्मरणीय गोष्ट म्हणजे त्या संस्थानांत नुकतीच भरलेली सहकारी परिषद् आणि तिचें खुद्द महाराजांनीं केलेलें उद्घाटन होय. आपल्या भाषणांत महाराजांनीं ग्वालेरमधील सहकारी संस्थांच्या इतिहासाचें त्रोटक रीतीनें सिंहावलोकन करून शेतकरी वर्गाची सर्वांगीण उन्नति होण्याच्या महत्वावर जोर दिला आणि ती घडून येण्याच्या मार्गाचा उल्लेख केला. परिषदेस रिझर्व्ह बँकेचे श्री. आंबेगांवकर, श्री. भास्करराव जाधव, श्री. विनायक मेथा, आय. सी. एस., ( संयुक्त प्रांतांतील एक कमिशनर ), पंडित हृदयनाथ कुंझरू, हैद्राबाद, बडोदा, म्हैसूर व काश्मीर ह्या संस्थानांतले सहकारी रजिस्ट्रार्स, लाहोरचे मि. बशीर अहमदखान व पुण्याच्या सेंट्रल बँकेचे श्री. चितळे ही मंडळी दरबारचे पाहुणे या नात्यानें उपस्थित होती आणि त्यांनीं चर्चेमध्यें भाग घेऊन परिषदेस आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा दिला.

परिषदेचा मुख्य कार्यक्रम ता. १५ व १६ जानेवारी ह्या दोन दिवशीं पार पाडण्यांत आला आणि ता. १७ व १८ ह्या दिवशीं जमलेल्या कार्यकर्त्यांनीं आपल्या अडचणींचा व कार्यक्रमाचा व्यावहारिक पद्धतीनें तपशीलवार विचार केला. प्रो. काळे ह्यांच्या रिपोर्टांतील शिफारसींचे चार गट करण्यांत येऊन त्यांतील प्रश्नांची क्रमशः चर्चा झाली. मध्यवर्ती बँकांची स्थापना, बँकांसाठी सल्लागार मंडळें, जिल्हा बँकांनीं अंगावर घ्यावयाच्या नवीन जबाबदाऱ्या याबाबत कडाक्याचा वादविवाद होऊन परस्परविरुद्ध मतें जोरानें प्रतिपादण्यांत आलीं. अध्यक्षांनीं मतप्रदर्शनास पूर्ण मुभा दिली होती आणि एकूण परिस्थितीचा विचार करतां ठराव पास करण्याऐवजी परिषदेंत भिन्नभिन्न अभिप्राय व्यक्त व्हावे आणि ते सर्व दरबारकडे पाठवण्यांत यावे ह्या पद्धतीचा स्वीकार केला होता.

जिल्हा व परगणा बँकांचे चालकांस स्वतःवर नवीन येऊन पडणाऱ्या स्वातंत्र्याच्या जबाबदाऱ्या कशा फार पाडतां येतील ह्याविषयीं एका बाजूनें चिंता वाटत होती, तर सढळ सरकारी द्रव्यसहायाबरोबर येणारें आणि अनुभवाच्या अभावीं आवश्यक असलेलें नियमन यत्किंचितहि नको होतें. नवीन स्थापन होणाऱ्या मध्यवर्ती बँकांच्या कार्याचा परिणाम स्वतःच्या व्यवहारांवर कसा होईल ह्याची काळजीहि त्यांस वाटत होती. परिषदेच्या तिसऱ्या व चौथ्या दिवसांच्या बैठकींत तपशीलवार चर्चा झाली तेव्हां बऱ्याच शंकांचें निरसन झालेलें दृष्टोत्पत्तीस आलें आणि प्रतिनिधींस वाटत असलेल्या अडचणींचा व त्यांच्या विधायक सूचनांचा विचार झाला.

ग्वालेर संस्थानांत असल्या प्रकारची ही पहिलीच परिषद् असल्यानें प्रतिनिधी व एकंदर जनता ह्यांमध्यें विशेष उत्साह व औत्सुक्य दिसून येत होतें. चर्चा टीकात्मक, सूचनात्मक, मोकळ्या मनाची व साधकबाधक अशी झाली. एका वक्त्यानें बोलून दाखविल्याप्रमाणें, ग्वालेरच्या सहकारी चळवळींत आतां नवचैतन्य उत्पन्न झालें आहे. अध्यक्षांनीं प्रत्येक प्रश्नाविषयींची स्वतःची भूमिका समजावून सांगितली आणि स्थानिक परिस्थितींत कोणत्या सुधारणा इष्ट व व्यावहारिक आहेत, ह्याचें दिग्दर्शन केलें. परिषदेंत उपस्थित असलेल्या अनेक गृहस्थांनीं विधायक कार्य करण्याची आपली तयारी दाखविली आणि त्यांचीं नांवें होतकरू कार्यकर्ते म्हणून दाखल करण्यांत आलीं. महाराजांच्या प्रास्ताविक भाषणांत व्यक्त झालेली कळकळ, त्यांचा अधिकारी व बिनअधिकारी लोकांस विधायक काम करण्याविषयींचा उपदेश आणि सरकारची प्रगतीप्रीत्यर्थ जनतेस सहाय देण्याची तयारी असल्याबाबतचें आश्वासन ह्यांचा परिषदेच्या मनावर चांगला परिणाम अगोदरच झाला होता आणि प्रो. काळे ह्यांनीं खुलासेवार केलेल्या स्पष्टीकरणानें तो विशेष दृढ झाला.

## हिंदी आयुर्विमा कंपन्यांचे संख्येंत वाढ

### सन १९३५ मधील कामाचा अहवाल

१९३५ सालीं सबंध हिंदुस्थानांत मिळून ४३ कोटि, २० लक्ष रुपयांचीं २ लक्ष, ३९ हजार आयुर्विमा पत्रकें देण्यांत आलीं व त्यांवरील हप्त्यांचें वार्षिक उत्पन्न २¼ कोटि रु. भरलें. ह्या कामापैकीं हिंदी कंपन्यांचे वाटणीस ३१½ कोटि रुपयांच्या २ लक्ष, ५ हजार पॉलिसी आल्या. त्यांचे वार्षिक हप्ते १ कोटि, ६० लक्ष रुपयांचे आहेत. ब्रिटिश विमा कंपन्यांस ४½ कोटि रुपयांचे विमे मिळाले. साम्राज्यांतर्गत देशांतील कंपन्यांनीं ६½ कोटींचे विमे उतरविले व एकच जर्मन कंपनी हिंदुस्थानांत काम करीत आहे, तिनें ½ कोटींचें काम मिळविलें.

१९३५ अखेर २ अब्ज, ३५ कोटि रुपयांचे १० लक्ष, ९५ हजार विमे चालू होते व त्यांचें हप्त्यांचें उत्पन्न १२ कोटि रुपये होतें. ह्यांपैकी हिंदी कंपन्यांकडे ७ कोटि रु. हप्त्यांचे, १ अब्ज, ४६ कोटि रुपये किंमतीचे ८,३६,००० विमे चालू होते.

अहवालाचे वर्षी सालिना ३ लक्ष, २० हजारांच्या वर्षासनांची जबाबदारी विमा कंपन्यांनीं स्वीकारली, त्यापैकी २९ हजारांचें काम हिंदी कंपन्यांस मिळालें. वर्षअखेर चालू असलेल्या एकूण ९ लक्ष २१ हजारांच्या वर्षासनांपैकी फक्त १½ लाखांचें काम हिंदी कंपन्यांकडे होतें.

# स्फुट विचार

### शेतकऱ्यांच्या जमिनींच्या मालकीचें संरक्षण

शेतकऱ्यांच्या कर्जफेडीची तहकुबी प्रांतिक सरकारनें तात्काल जाहीर करावी अशी मागणी मुंबईच्या प्रधान मंडळाकडे करण्यांत आली असतां, ऋणविमोचन व कर्ज लवादाची व्यवस्था झाल्यावांचून नुसती तहकुबी देण्यांत फायदा नाहीं असा अभिप्राय व्यक्त केला गेला होता. त्यांतलें रहस्य प्रांतिक प्रधानमंडळाच्या ध्यानांत येऊन तहकुबीच्या मागणीस त्यानें मान्यता दिली नाहीं. परंतु ऋणमुक्ततेसंबंधाच्या कायद्याचा मसुदा तयार होऊन तो विधिमंडळापुढें मांडला जाण्यास आणि शेवटीं त्याचा कायदा होण्यास कालावधि लागेल आणि मध्यंतरीं लहानसहान शेतकऱ्यांवर सावकार लोक कर्जफेडीबाबत दावे लावून त्यांच्या जमिनी ताब्यांत घेण्याचा संभव आहे. महाराष्ट्र व कर्नाटक ह्या विभागांत आणि गुजराथेंतील कांहीं ठिकाणीं शेतकऱ्यांस कर्ज लवादाचा फायदा मिळण्यापूर्वींच आपल्या जमिनींस मुकावें लागण्याची भीति उत्पन्न झाली असून त्यासंबंधानें योग्य तजवीज करणें सरकारास आवश्यक वाटत आहे. प्रांतिक विधिमंडळापुढें कायद्याचा मसुदा यावयाचा आहे त्याचा फायदा लहान खातेदारांस मिळावा आणि त्याची अंमलबजावणी मार्च,१९३९ पर्यंतच व्हावी अशी सरकारची योजना आहे. बागाइत जमीन पांच एकरांपर्यंत व इतर जमीन पंधरा एकरांपर्यंत धारण करणारांवर कर्जवसुलीचे दावे चालूं नयेत आणि हे शेतकरी स्वतः जमीन करणारेच असले पाहिजेत अशी मर्यादा घातली जावयाची आहे. योजलेल्या कायद्याचा हा विशेष महत्त्वाचा असून जातीनें शेत करणाऱ्या गरीब शेतकऱ्यांस सहाय करण्याचें त्यांतलें तत्त्व सार्वत्रिक मान्यता मिळण्यासारखें आहे. कर्जफेडीसाठी लहान शेतकऱ्यांच्या जमिनी विकण्याची सर्व कारवाई कायद्याच्या मुदतींत त्या बाबतींत अर्ज दिला गेल्यास बंद होतील. ह्या योगानें एखाद्या धनकोचें विशेष नुकसान होण्याचा संभव असल्यास कारवाईच्या बंदीस मान्यता न देण्याचा अधिकार कलेक्टरास देण्यांत येईल. त्याचप्रमाणें, शेतकऱ्यांनीं कलेक्टरच्या परवानगीवांचून आपल्या जमिनी खाजगी रीतीनें दुसऱ्यांस देण्याची मनाई केली जाईल. कायद्याचा दुरुपयोग केला जाऊं नये हा या तजविजीचा उद्देश आहे.

---

### प्रांतिक अंदाजपत्रकें आणि रेल्वेजचें उत्पन्न

"हिंदुस्थान सरकारचें बजेट ही रेल्वेजवरची जुगार आहे" ही एक जुनी म्हण प्रसिद्ध आहे. पाऊसपाण्याच्या अनिश्चितपणाचा बरावाईट परिणाम हिंदी शेतीच्या धंद्यावर व व्यापारावर होत असतो आणि वहातुकीचा मोठ्या प्रमाणावर व्यवहार करणाऱ्या रेल्वे कंपन्यांसहि तो भोगावा लागतो. कधीं फायदा तर कधीं नुकसान अशी स्थिति रेल्वेजची झाल्यानें त्यांच्या उत्पन्नांत अंशभागी असणाऱ्या हिंदुस्थान सरकारच्या बजेटाचीहि तारांबळ उडते. जुगारीच्या स्वरूपाची ही भानगड दूर करण्याच्या हेतूनें, रेल्वेजनीं मध्यवर्ती सरकारास प्रतिवर्षीं एक ठराविक रकम द्यावी अशी व्यवस्था कांहीं वर्षांमागें चालू करण्यांत आली आणि कित्येक वर्षे ती यशस्वीहि झाली. परंतु पुढें आर्थिक मंदीच्या काळांत रेल्वेज नुकसानींत आल्या आणि त्यांस ठरलेली रकम प्रतिवर्षीं सरकारास देणें अशक्य झालें. रेल्वेजचे निधि नाहींसे होण्याची पाळी आली असतां त्यांपासून हिंदुस्थान सरकारास काय प्राप्त होणार? अशा स्थितींत हिंदी बजेटांतून रेल्वेजपासून मिळणारें उत्पन्न काढून टाकण्याची म्हणजे त्यांस संपूर्ण माफी देण्याची पद्धति चालू झाली. प्रांतिक स्वायत्ततेच्या घटनेस प्रांतांमध्यें प्रारंभ झाला तेव्हां ती यशस्वी होण्यास प्रांतिक सरकारांस मध्यवर्ती सरकाराच्या उत्पन्नांत ठराविक वांटा मिळण्याची आवश्यकता भासली. रेल्वेजची सांपत्तिक स्थिति सुधारल्यास कांहीं वर्षांनीं ह्या प्रकारची योजना अमलांत यावी अशी शिफारस नीमायर रिपोर्टांत केलेली आहे. चालू वर्षीं रेल्वेजचें उत्पन्न अपेक्षेपेक्षा वाढलें असल्यानें प्रांतिक सरकारांस हिंदुस्थान सरकाराकडून एकूण दीड कोटि रुपये मिळूं शकतील असें दिसतें. गेल्या दोन महिन्यांत रेल्वेजचें उत्पन्न घटलें आहे आणि पूर्वीं वाटत होतें तेवढा वाढावा त्यांत होण्याचा संभव नाहीं. तथापि, कांहीं रकमा प्रांतिक सरकारांच्या पदरांत पडतील ह्यांत शंका नाहीं. पुढील सालच्या अंदाजपत्रकांत कोणती रकम दाखल करावी ह्या विषयाची अडचण प्रांतिक अर्थमंत्र्यांस भासणार आहे. दिल्ली येथें भरलेल्या सभेंत सर जेम्स ग्रिग ह्यांनीं त्यांस ह्याबाबत दिलेल्या कानमंत्राच्या आधारावरच अर्थमंत्र्यांस आपल्या बजेटांची उभारणी करावी लागेल, हें उघड आहे.

---

### दिल्ली येथील अर्थमंत्र्यांची परिषद

प्रांतिक अर्थमंत्र्यांची परिषद हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यांचे अध्यक्षतेखालीं गेल्या आठवड्यांत भरली होती. मध्यवर्ती सरकार व प्रांतिक प्रधानमंडळें ह्यांच्या उत्पन्न-खर्चाच्या व्यवस्थेचा निकट संबंध असल्यानें त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींमध्यें विचारविनमय होऊन सर्वसंमत धोरण निश्चित होणें आवश्यक आहे. हिंदुस्थान सरकारच्या उत्पन्नांत प्रांतिक सरकारांस मिळावयाचा वांटा, प्रांतिक सरकारांनीं काढावयाचीं कर्जें आणि त्यांनीं बसवावयाचे टर्मिनल टॅक्ससारखे कर इत्यादि बाबतींत चर्चा होण्याचें महत्त्व विशेष आहे हें सांगावयास नको. देशाच्या आर्थिक व्यवहारांस लागणाऱ्या पैशाचा पुरवठा पुरेसा राहील ह्याविषयीं तरतूद करण्याची कामगिरी आतां रिझर्व्ह बँकेकडे सोंपवण्यांत आली आहे आणि प्रांतिक सरकारांस काढाव्या लागणाऱ्या कर्जांबाबत त्यांस त्या बँकेशीं व्यवस्था केली पाहिजे. त्या बँकेचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर, दिल्ली येथील परिषदेस हजर राहाण्याचें हें मुख्य कारण आहे. प्रांतिक अर्थमंत्र्यांस एकमेकांशीं विचारविनिमय करून आपापलें धोरण आखण्यास ह्या परिषदेची उत्कृष्ट संधि मिळाली आहे. कित्येक करांचे संबंधांत हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारें ह्यांचेमध्यें एकवाक्यता होणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें, ह्या बाबतींत प्रांतिक सरकारांचे हितसंबंध, त्यांत परस्पर विरोध उत्पन्न होण्याचा संभव असल्यानें, मिळते करून घेण्याची जरूरी भासणार आहे. ह्या सर्व गोष्टींचा खल होऊन प्रांतिक अर्थमंत्र्यांस आपलीं अंदाजपत्रकें बनवण्यास व सांपत्तिक घडी बसवण्यास दिल्लीच्या परिषदेचा उपयोग होणार आहे.

---

### नव्या दिल्लींत सरकार दप्तराचें कायम ठाणें?

हिंदुस्थान सरकारची राजधानी कलकत्त्याहून दिल्लीस हालवण्यांत येऊन नवीन दिल्ली शहराची आधुनिक पद्धतीची रचना झाली तेव्हां ह्या खर्चिक योजनेनंतर सरकारी कचेऱ्या सिमल्यास कांहीं महिने नेण्याची आवश्यकता रहाणार नाहीं,अशी कल्पना

होती. नवीन दिल्लीस सरकारचें कायमचें ठाणें व्हावें अशीच त्याची व्यवस्था ठरवण्यांत आली होती आणि त्यासाठी सढळ हातानें खर्चहि झाला. परंतु दिल्लीची उष्णता सरकारी कचेऱ्यांस उन्हाळ्यांत मानवणार नाहीं आणि सिमल्याचें गिर्यारोहण बंद करणें शक्य होणार नाहीं असें कित्येकांचें प्रथमपासूनच म्हणणें होतें. सरकारनेंहि सिमल्यास स्थलांतर बंद होण्याचे बाबतींत फारशी उत्सुकता दर्शविली नाहीं. तथापि सरकारच्या कचेऱ्यांचा परिवार अलीकडे इतका वाढला आहे कीं, सिमल्यास कांहीं महिन्यांपुरती त्यांची रहाण्याची व कामाची व्यवस्था करणें दुर्घट होऊन गेलें आहे. ह्याकरितां कांहीं कचेऱ्या नव्या दिल्लींत कायम रहाव्या, त्यांनीं उन्हाळ्यांत सिमल्यास जाण्याचें कारण नाहीं, असें आतां सरकारनें ठरविलें आहे. सिमल्याचा प्रवास व तेथें कांहीं काल रहाणें हें सर्वस्वी बंद करण्याचा प्रश्न मात्र त्यानें अनिर्णित ठेवला आहे. सरकारच्या नेहमीच्या सावधगिरीच्या धोरणास धरूनच ही व्यवस्था आहे. फेडरल घटना अस्तित्वांत आली म्हणजे ह्या प्रश्नाचा शेवटचा निकाल करणें युक्त होईल असें मत व्यक्त केलें जात आहे. सिमल्याची चढण कायमची सुटायची तर दिल्लीमध्यें अधिक विस्तृत व प्रशस्त कचेऱ्यांची आणि रहाल्या घरांची तरतूद करावी लागणार आहे. मुख्य प्रश्नाचा अखेरचा निकाल लागण्याचे मार्गांत ही अडचण उभी आहेच. दिल्लीस सरकारचें स्थिर वास्तव्य होण्याचे योजनेस निदान प्रारंभ झाला आहे एवढेंच समाधान आज मानलें पाहिजे.

## स्वदेशी धंदे आणि परराष्ट्रीय व्यापार

हिंदुस्थानचा परराष्ट्रीय व्यापार १९३६–३७ सालांत पूर्वीच्या दोन वर्षांच्या मानानें वाढलेला असला तरी हिंदी मालाची निर्गत आर्थिक मंदीच्या मागच्या म्हणजे १९२८–२९ सालाच्या पेक्षा ४१ टक्क्यांनीं कमी होती, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. १९२८–२९ पेक्षा १९३६–३७ मध्यें वजनाच्या दृष्टीनें माल अधिक बाहेर गेला तरी किंमतीमध्यें एवढी मोठी तूट आली; आणि ह्याचें मुख्य कारण निर्गत मालाच्या किंमतींतली घट हें होय. हिंदुस्थानास आपल्या निर्गत व्यापाराचा मोबदला ह्या रीतीनें कमी मिळाल्यामुळें आयात व्यापारहि घटणें अपरिहार्यच होतें. १९३५–३६ सालीं आयात व्यापार १३४ कोटि रुपयांचा झाला होता, पण १९३६–३७ मध्यें तो फक्त १२५ कोटि रुपयांचा झाला. १९२८–२९ मध्यें हिंदी आयात व्यापाराची किंमत २५३ कोटि रुपये होती, तिच्यामध्यें १९३६–३७ सालीं ५१ टक्के घट झाली. १९२८–२९ सालाशीं तुलना करतां असें दिसतें कीं आयात व्यापार इतका कमी झाला, पण आयात मालाच्या बाजारभावांत फक्त ३५ टक्के घट झाली होती. किंमतीच्या उतारापेक्षा आयात व्यापाराच्या किंमतींत अधिक घट कां झाली ? ह्याचें उत्तर असें आहे कीं, गेल्या पांच-सात वर्षांत हिंदी लोक बाहेरून येणाऱ्या परदेशी मालाचे ऐवजीं स्वदेशी माल तयार करून वापरूं लागले आहेत. उदाहरणार्थ, स्वदेशी साखरेचें उत्पादन तिप्पट झालें आहे, सिमेंटचें ८० टक्के, पोलादाचें ७० टक्के आणि कागदाचें २५ टक्के वाढलें आहे आणि कापडाचा खप दुप्पट झाला आहे. स्वदेशी उद्योगधंद्यांची ही प्रगति उत्तेजनकारक आहे, ह्यांत शंका नाहीं. सोन्याची निर्गत मंदावली आहे आणि गेल्या वर्षी, उलट, चांदीची आयात वाढली. परराष्ट्रीय व्यापार आणि स्वदेशी उद्योगधंद्यांचा उत्कर्ष ह्यांचा परस्पर-संबंध लक्षांत येणें आवश्यक आहे.

## बेकारी आणि आर्थिक मंदी

अनेक देशांमध्यें मालाचें उत्पादन वाढत असल्याचें आकड्यांवरून दिसून येतें. तथापि, बेकारांची संख्या पाहिली असतां ह्या प्रगतीसंबंधानें शंका वाटूं लागते. शिवाय, जगांतील राष्ट्रांमध्यें लढाऊ सामुग्री बनवण्याचा प्रचंड उद्योग चालू आहे, त्यामुळें बेकारीस तात्पुरता आळा बसला आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आंतरराष्ट्रीय व्यापार विशेष वाढला नसून राष्ट्रांच्या अंतर्गत व्यापारांत वाढावा झालेला आहे ह्या गोष्टीचीहि जाणीव राखणें आवश्यक आहे. गेल्या सात-आठ वर्षांच्या अनुभवावरून कित्येक महत्त्वाच्या प्रश्नांवर नवा प्रकाश पडला असून त्याविषयींचे जुने सिद्धांत बदलणें प्राप्त झालें आहे असें एक इंग्रज लेखक म्हणतो. सुधीची बेकारी अस्तित्वांत असणें शक्य नाहीं असें ठाम मत १९३० सालाच्या मागें प्रचलित असे. आतां त्यावर कोणाचाच विश्वास राहिलेला नाहीं. बेकारीच्या निवारणासाठीं सरकारी तिजोरीमधून खर्च करणें व्यवहारशून्यतेचें लक्षण आहे असें मानण्यांत येत असे. सार्वजनिक पैशांतून बेकारांची पोटाची सोय करीत नाहीं असा औद्योगिक महत्त्वास चढलेला एकहि देश आजमितीस आढळावयाचा नाहीं. सुधारलेलीं यंत्रें झपाट्यानें उपयोगांत येत असल्यानें बेकारांस काम मिळण्याची पंचाइत पडत आहे. वयस्क कामकऱ्यांस नवीन यांत्रिक काम नीट करतां येत नाहीं आणि अशांची संख्या वाढत रहाणार अशीं लक्षणें दिसत आहेत. मंदी हाटवण्यास मजुरीचे दर कमी करणें हा उचित उपाय नव्हे ही गोष्टहि अनुभवानें सिद्ध झाली आहे. किमान मजुरीचे दर निश्चित करण्याचें महत्त्वहि कित्येक देशांस पटलें आहे. आर्थिक मंदी व बेकारी ह्यांसंबंधांतले वरील विचार ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत.

## कपाशीच्या उत्पादन-खर्चाविषयीं चौकशी

हिंदी कपाशीच्या उत्पादन-खर्चाविषयींची चौकशी करण्यास इंडियन सेंट्रल कॉटन कमिटीनें पांच वर्षांपूर्वी प्रारंभ केला. हें काम आतां पुरें झालें असून रिपोर्ट लवकरच बाहेर पडेल. कापूस पेरणाराच्या कुटुंबांतील लोक शेतावर विनामूल्य काम करतात, ह्यामुळें उत्पादन खर्चाचा हिशेब बिनचूक काढतां येणें कठीण आहे, असें चौकशींत आढळून आलें. बाहेर प्रचलित असलेल्या मजुरीच्या दरानें ह्या कुटुंबीयांचा रोजगार खर्च आकारून आंकडे तयार करण्यांत आले आहेत. ह्या चौकशीस सुमारें १½ लक्ष रु. खर्च आला. कपाशीच्या उठावाच्या व्यवस्थेविषयीं मि. लिव्हिंग्स्टन हे चौकशी करीत आहेत, ती पुरी झाली म्हणजे कपाशीच्या पिकासंबंधीं पूर्ण माहिती उपलब्ध होईल.


# जाहीर नोटीस.

## औंध स्टेट सेंट्रल बँक लि. औंध

शाखा:—आटपाडी, कुंडल, गुणदाळ, विचूद, दिवंची.

आम्ही मुदतठेवी खालील व्याजाचे दरानें स्वीकारतों :

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मुदत | १ | वर्ष | द. द. | २ टक्के. |
| ” ” | २ | ” | ” ” | २॥ टक्के. |
| ” ” | ३ | ” | ” ” | ३ टक्के. |
| ” ” | ४ | ” | ” ” | ३॥ टक्के. |
| ” ” | ५ | ” | ” ” | ४ टक्के. |

औंध, ( जि. सातारा )
ता. २०–१–३८.

वी. आर. वर्तक.
मॅनेजर.

## रत्नागिरी जिल्ह्यांतील अर्बन बँकांच्या प्रतिनिधींची सभा

( ता. ९।१।३८ )

**मंजूर झालेले ठराव**

ठराव १—अर्बन बँकांचें कार्यक्षेत्र तूर्त शहरांपुरतेंच मर्यादित आहे तें वाढवून त्यांना त्या त्या तालुक्यांतील गृहस्थांशीं व सहकारी मंडळयांशीं व्यवहार करण्याची परवानगी मिळणें सहकारी चळवळीचा प्रसार जास्त प्रमाणांत होण्याचे दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. तरी तशी परवानगी ज्या ज्या बँकेकडून मागणी केली जाईल त्याप्रमाणें द्यावी अशी रजिस्ट्रार साहेबांस विनंति.

ठराव २—रत्नागिरी जिल्ह्यांतील अर्बन बँकांची वाढ आणि प्रगती होण्याला व तसेंच त्यांच्या द्वारां एकंदर सहकारी चळवळीचा प्रसार होण्यास सध्या असलेली R. T. R. ची सवलत त्या जिल्ह्यांतील विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतां अत्यंत आवश्यक आहे. सबब ती कायम स्वरूपाची करण्याबद्दल मुंबई सरकारला विनंति.

ठराव ३—रत्नागिरी जिल्ह्यांत सहकारी मंडळयांस कर्जें देण्याकरितां स्वतंत्र संस्था नसल्यामुळें व मुंबई प्रां.सहकारी बँकेकडून कर्जें घेणें तितकेंसें सोईस्कर होत नसल्यामुळें रत्नागिरी अर्बन बँकेस, रत्नागिरी तालुक्यांतील व जिल्ह्यांतील सोसायट्यांस अन्य व्यवस्था होईपर्यंत कर्ज देण्याची परवानगी देण्याबद्दल रजिस्ट्रार साहेबांस विनंति.

ठराव ४–जिल्ह्यांतील अर्बन बँकांतून सध्या असलेल्या नोकरवर्गास ( कांहीं अपवाद खेरीज करून ) त्यांचेवर पडणारे जबाबदारीचे दृष्टीनें सहकारी चळवळीचें शिक्षण असणें अत्यंत आवश्यक आहे. तसें शिक्षण देण्याची तजवीज रत्नागिरी सेंट्रल को. इन्स्टिट्यूटनें स्वतंत्र वर्ग काढून करावी, अशी त्या संस्थेस विनंति.

ठराव ५—जिल्ह्यांतील अर्बन बँकांचें, विशेषतः नवीनच स्थापन झालेल्या अर्बन बँकांचें, काम प्रगतिपर राहाण्याचे दृष्टीनें व त्यांचे कामांत एकसूत्रीपणा राखण्याचे दृष्टीनें त्यांचेवर योग्य देखरेख ठेवणें जरूर आहे.सध्या अशी देखरेख रत्नागिरी सेंट्रल को. इन्स्टिट्यूटकडून होत आहे,ती तशीच चालू ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. तसेंच, अर्बन बँकांचें लोकल ऑडिटहि योग्य रीतीनें होणें, त्यांचे प्रगतीचे दृष्टीनें,अत्यंत आवश्यक आहे. सध्या कांहीं बँका, लोकल ऑडिट इन्स्टिट्यूटच्या प्रचारकांकडून करवून घेत आहेत. तसें तें करून घेण्यास मे. रजिस्ट्रारनेंहि परवानगी दिलेली आहे. तरी सर्व बँकांनीं ( रत्नागिरी बँकेची स्वतंत्र सोय असल्यामुळें ती खेरीज करून ) या योजनेचा अवश्य फायदा घ्यावा अशी विनंति.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,००० विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,२५,००० वसूल झालेलें भांडवल १,१२,४००

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअर बद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

लक्षांत ठेवा ] १९३७–३८ सालअखेर [ लक्षांत ठेवा

## कॉमनवेल्थचें तृतीय मूल्यमापन होणार

" जनतेच्या सहानुभूतीमुळेंच "कॉमनवेल्थ" नें सर्व विमा संस्थांत अग्रस्थान मिळविलें आहे व त्याबद्दल आम्ही जनतेचे अत्यंत आभारी आहोंत."

श्री. आर. एन. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंटस्,
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी, लिमिटेड
११ बुधवार पेठ, पुणें नं. २.

महाराष्ट्रांतील प्रत्येक ठिकाणीं भरपूर कमिशनवर एजंट्स् नेमणें आहेत. तरी विशेष माहितीकरितां हेडऑफिसकडे पत्रव्यवहार करावा.

" अर्थ " ग्रन्थमाला

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.

कि. १ रु. ( ट. ख. निराळा )
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

### शेतकऱ्यांची आर्थिक सुधारणा—कर्नाटक प्रदर्शनाचें उद्‌घाटन

मुंबई इलाखाधिपति, सर रॉजर लम्ले, ह्यांनीं गेल्या आठवड्यांत बेळगांव येथील कर्नाटक शेतकी प्रदर्शनाचें उद्‌घाटन केलें. महमूल मंत्रि, श्री. मुरारजी देसाई, ह्यांनीं आपल्या भाषणांत सरकार खेडेगांवांच्या सुधारणांस शहरांतील प्रश्नांपेक्षा जास्त महत्व कां देतें ह्याचा खुलासा केला. शेकडा सत्तर लोकांचें पोट शेतीवर अवलंबून आहे व शेतकऱ्यांची सध्याची आर्थिक स्थिति अत्यंत शोचनीय झाली आहे, ती लवकर सुधारण्यांत आली नाहीं तर त्यांचें डोकें पुनः वर निघणें अशक्यप्राय होईल, असें त्यांनीं सांगितलें. प्रांतिक सरकारच्या उत्पन्नापैकी बराच मोठा भाग शेतकऱ्यांकडूनच येतो व त्या मानानें शहरांवर खर्च जास्त होतो. ही परिस्थिति पालटली पाहिजे, असे ते म्हणाले. म्हणजे, शहरांतील लोकांवर जादा कर बसवून त्याचा विनियोग खेडेगांवांच्या सुधारणेकडे करण्यांत यावा असें त्यांनीं पर्यायानें सुचविलें. इलाखाधिपतींनीं प्रदर्शनाचें उद्‌घाटन करण्यापूर्वी भाषण करून शेतीसुधारणेचें महत्व प्रतिपादन केलें. "दुष्काळ, कर्जबाजारीपणा, इत्यादि अनेक गोष्टींपैकीं कांहीं जरी शेतकऱ्यांच्या हातांत नसल्या, तरी त्यांस आपलें काम दूरदृष्टीनें, कुशलतेनें व परिस्थितीस अनुरूप असें पार पाडतां येणें शक्य आहे. लहानशा सुधारणेचा अवलंब अनेक खेड्यांतून करण्यांत आला तर त्याचा सुपरिणाम तात्काळ दिसून येईल व शेतकऱ्यांच्या अडचणी त्या मानानें कमी तीव्र होतील" असें त्यांनीं सांगितलें. इलाखाधिपतींनीं, शेतकऱ्यानें स्वतः काय केलें पाहिजे ह्याचें दिग्दर्शन केलें व श्री. मुरारजींनीं सरकारची त्या बाबतची जबाबदारी स्पष्ट केली. दोनहि दृष्टींनीं प्रयत्नांची शिकस्त झाल्यास, शेतकऱ्यांच्या आर्थिक सुधारणेच्या प्रश्नांतील बिकटपणा कमी होईल.

### शुद्ध-शब्द-कोश*

"तात्काळ बहिष्कार्य उर्दू परकीय शब्दांना तदर्थक स्वकीय शब्द देणारा" हा शुद्ध-शब्द-कोश रत्नागिरी येथील भाषा-लिपि-शुद्धि मंडळाचे अध्यक्ष, श्री. अ. स. भिडे, बी. ए., बी. टी., ह्यांनीं रचिला आहे. बोलतांना किंवा लिहितांना वापरले जाणारे इंग्रजी शब्द ओळखून त्यांचे ऐवजी मराठी शब्दांची योजना करतां येते, परंतु उर्दू शब्द अनेक वर्षांपासून रूढ झाले असल्याकारणानें विशिष्ट शब्द उर्दू आहे कां मराठी आहे, हें चटकन सांगतां येत नाहीं. प्रस्तुत शुद्ध-शब्द-कोशांत अशा ५०० उर्दू शब्दांस मराठी प्रतिशब्द दिलेले आहेत. अर्थपालट होणार नाहीं अशा बेतानें मात्र त्यांचा उपयोग केला गेला पाहिजे. कोशाच्या पुनरावृत्तीचे वेळीं रूढ इंग्रजी शब्दांसहि मराठी प्रतिशब्द देण्याचा श्री. भिडे ह्यांचा विचार आहे. शुद्ध-शब्द-कोशाची उपयुक्तता निर्विवाद आहे. लेखकांस तो विशेष उपयोगी होईल.

*पृ. सं. २८, मूल्य ४ आणे. प्रकाशकः श्री र. भि. कुळकर्णी, प्रचंड पुस्तक भांडार, रत्नागिरी.

### हिंदुस्थानचा इटलीशी व्यापार

मिलन (इटली) येथील हिंदी ट्रेड कमिशनरचा १९३६-३७ सालाविषयींचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे, त्यावरून इटलीमध्यें हिंदी मालाची होणारी आयात घटत असल्याचें दिसून येतें. इटलीनें स्वयंपूर्णतेच्या धोरणाचा अवलंब केल्याकारणानें व शक्य त्या प्रकारचा कृत्रिम माल बनवून परदेशांवरील अवलंबन दूर करण्याची त्यानें शिकस्त केल्यामुळें, हिंदी मालाचा खप त्या देशांत कमी होऊं लागला आहे. इटलीस माल पुरविणाऱ्या राष्ट्रांत, मालाच्या किंमतीचे दृष्टीनें, हिंदुस्थानाचा पांचवा अनुक्रम लागत असे, तो आतां नवावर घसरला आहे. इटलीनें कृत्रिम कपास, कृत्रिम रेशीम व कपास-मिश्रित ताग ह्यांचें कापड बनविण्याची नेटानें खटपट चालविली आहे त्याचा परिणाम हिंदी कपाशीच्या उठावांत घट होण्यामध्यें झाला. तागाची हीच अवस्था झाली असून गळिताच्या धान्यांस चीन, ब्राझील व अर्जेंटाइन येथील मालाशीं टक्कर द्यावी लागत आहे. १९३७ च्या पहिल्या तिमाहींत परिस्थितीमध्यें सुधारणा झाली असल्याविषयीं रिपोर्टांत उल्लेख आहे, तथापि एकंदरीनें पहातां हिंदी मालाची इटलीमध्यें पीछेहाटच होत असल्याचें दिसून येतें. दक्षिण युरोपांत इटली हेंच हिंदुस्थानाचें प्रमुख गिऱ्हाइक आहे, तें सुटूं लागलें ही परिस्थिति आशाजनक नाहीं. आयात-निर्गत व्यापारासंबंधीं निश्चित राष्ट्रीय धोरण आखून हिंदी परराष्ट्रीय व्यापाराचें संरक्षण व संवर्धन सरकारनें करणें अगत्याचें आहे.

### ग्वालेर येथील "मेळा"

आपल्या इकडे जत्रांमधून बाजार भरतात आणि त्यांत खरेदी-विक्रीसाठी दूर अंतरावरून माणसें आकर्षलीं जातात. उत्तर हिंदुस्थानांत मोठमोठ्या ठिकाणीं ह्या प्रकारचे "मेळे" भरतात. हरतऱ्हेचा माल व्यापारी लोक शेकडो मैलांवरून नेऊन त्याच्या विक्रीकरितां मेळ्यांत दुकानें थाटतात आणि भोंवतालच्या प्रदेशांतील जनतेस हा बाजार फारच सोयीचा होतो. जत्रेप्रमाणें मेळ्यांत करमणुकीचीं साधनें विपुल असल्यानें बायका-मुलांच्या झुंडीच्या झुंडी मेळ्यांस जमतात. हे बाजार दोन-तीन आठवडे चालू राहातात.

उत्तर हिंदुस्थानांत ग्वालेरचा वार्षिक "मेळा" आज अनेक वर्षें प्रसिद्धी पावलेला आहे. सुमारें शंभर एकर क्षेत्रफळाचें विस्तीर्ण मैदान सरकारनें मेळ्यासाठीं राखलें असून त्यांत पक्कीं दुकानें बांधलीं आहेत. मेळ्यांत येणाऱ्या मालास जकातीची माफी आहे ह्या कारणानें बाहेरून माल मोठ्या प्रमाणांत येऊन त्याची चांगली विक्री होते. मेळ्यांत चोहोंकडे विजेची रोषणाई आहे आणि बाजाराची मांडणी पद्धतशीर केलेली आहे. त्यांत अनेक चौक आहेत व प्रत्येकांत विश्रांतीकरितां बंदिस्त जागा आहेत. प्रत्येक चौकांत रेडिओमधून गाणीं ऐकवलीं जातात आणि पोलिसांचा बंदोबस्त कडेकोट असतो. मेळ्यांत वाटेल तो जिन्नस विकत मिळतो आणि कुस्त्यांची दंगल व नाटकें चालतात. ग्वालेरच्या मेळ्यांत दरवर्षी सुमारें दहा लक्ष रुपयांची उलाढाल होते असें म्हणतात. त्याची व्यवस्था एका समितीकडे सोपवलेली आहे.

अप-टु-डेट शिलाई करतां
**महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा**
बुधवार चौक, पुणें] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [खादी भांडाराचे माडीवर

## ' मुद्रण-प्रकाश '

पुणें प्रेस ओनर्स असोसिएशनतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या, छापखान्याच्या व तदंगभूत धंद्यांच्या विषयास वाहिलेल्या वरील त्रैमासिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला आहे. मुद्रणविषयक साहित्याची वाण दूर करून, जगांत ह्या विषयासंबंधानें कोठे कोठे काय काय घडामोडी नित्य होत आहेत व कोणकोणतीं नवीन साधनें निर्माण होत आहेत, ह्याची माहिती लोकांना करून द्यावी, ह्या हेतूनें त्रैमासिकाची योजना करण्यांत आलेली आहे. छापखानेवाल्यांच्या अडचणींचें निराकरण करणें व त्यांस आपला धंदा अधिक चांगल्या रीतीनें व मोठ्या प्रमाणावर कसा करतां येईल ह्याची माहिती देणें, हेंहि त्रैमासिकाचें उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रांतील छापखान्यांची संख्या सुमारें एक हजार असून त्यांत दीड कोटि रु.भांडवल गुंतलेलें आहे व ह्या धंद्यांत तीस हजार लोक काम करीत आहेत. महाराष्ट्रीयांचा हा उद्योग वाढीस लागावा, हा त्रैमासिकाचा उद्देश सफळ होणें त्यास मिळणाऱ्या सहायावर अवलंबून आहे. तूर्त हें त्रैमासिक म्हणून वर्षभर चालविण्यांत येईल व इष्ट वाटल्यास त्याचें मासिकांत रूपांतर करण्यांत येईल. " मुद्रण प्रकाशा"च्या पहिल्या अंकावरून त्रैमासिकाची उपयुक्तता स्पष्ट दिसून येते. पुणें प्रेस ओनर्स असोसिएशनचा हा उपक्रम अभिनंदनीय आहे. श्री. शं. ब. सहस्रबुद्धे व श्री. शं. रा. दाते हे दोघे मुद्रणतज्ज्ञ त्रैमासिकाचे संपादक आहेत.

---

### दि. सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

डिसेंबर, १९३७ अखेर संपलेल्या वर्षीं, मागील वर्षांतील नफ्याची बाकी धरून, वरील बँकेस एकूण ३२ लक्ष ३८ हजार रु. नफा झाला. जून, १९३७ अखेरच्या सहामाहीचें ६ टक्के दराचें करमाफ डिव्हिडंड देण्यांत आलें होतें; आतां त्याच दरानें सबंद वर्षाचें डिव्हिडंड कायम करण्यांत आलें आहे. म्हणजे, प्रत्येक भागास दुसऱ्या सहामाहीचे १२ आणे डिव्हिडंड मिळेल. ८ लक्ष, ६८ हजार रुपये नफा पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढण्यांत येईल.

---

### " बॉंबे को-ऑपरेटिव्ह क्वार्टर्ली "

वरील त्रैमासिकाचा डिसेंबर, १९३७ चा अंक प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्यें " स्वीडनमधील सहकारी चळवळ " " सहकारी सोसायट्यांच्या कर्जास मुदतीचा कायदा लागूं होतो काय ? " " डेन्मार्कमधील शेतीविषयक सहकार, " इत्यादि विषयांवर उपयुक्त लेख आले आहेत. " सेंट्रल बँकांचीं वैयक्तिक सभासदांस कर्जें " व " सहकारी कार्यकर्त्यांपुढील कार्यक्षेत्र " हे लेखहि उद्बोधक आहेत.

---

### जर्मनींतील सहकारी संस्था

गेल्या डिसेंबर महिन्याच्या प्रारंभीं जर्मनींतील सहकारी संस्थांची एकूण संख्या ५२, ०९० इतकी होती.

---

### युगोस्लाव्हियांत सहकारी चळवळ

मध्ययुरोपांतील युगोस्लाव्हिया ह्या चिमुकल्या देशांत एकूण लोकसंख्येपैकीं शेकडा ८० लोकांचा संबंध तेथील सहकारी चळवळीशीं आहे.

---


# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

PUBLIC CONFIDENCE

The following figures will convince you :

NEW BUSINESS

**Last year 1936-37**

**Exceeds**

**2 CRORES & 82 LAKHS**

BONUS

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches* : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Offices* : throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

शास्त्रशुद्ध पायावर काम करणारी, महाराष्ट्राची
प्रमुख प्रॉव्हिडंट विमा कं.

## दि हिंद बेनिफिट सोसायटी लि.

च्या लोकप्रिय
प्रपंच पॉलिसीकरितां प्रचारक पाहिजेत.

माहितीसाठीं लिहा.

किताब बिल्डिंग, बुधवार, पुणें. सेक्रेटरी.

पुणें येथील सर्वांत जुनी व वेळेवर कामें करणारी
टेलरिंग फर्म

## पाटसकर आणि कंपनी

D.M.T.O.A. (London.)

४८ निहाल पेठ, पुणें शहर.

सर्व प्रकारचे देशी व विलायती कापडाचे व
तयार कपड्यांचे व्यापारी

आमचेकडे—स्त्रिया, पुरुष व मुलें यांचे सर्व प्रकारचे फॅशनेबल कपडे ऑर्डरप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तयार करून मिळतील. घरीं येऊन मेझरमेंट घेतलें जाईल व कपडे घरपोंच मिळतील.

## जाधव टेलरिंग कॉलेज, पुणें.

### विद्यार्थ्यांचें वार्षिक संमेलन

या संस्थेच्या यंदाच्या वार्षिक संमेलनाचें अध्यक्षस्थान येथील आसि. कलेक्टर श्री. टी. एम. चौधरी एम. ए., यांनीं स्वीकारलें होतें. संमेलनास शनिवार, ता. २१ जानेवारी रोजीं सायंकाळीं ४-३० वाजतां सुरवात झाली. अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर संस्थेचे मॅनेजर, श्री. डी. ए. कुलकर्णी, यांनीं संस्थेची माहिती देतांना सांगितलें, " जाधव कॉलेज ऑफ टेलरिंग ॲण्ड कटिंग ही संस्था प्रि. जाधव यांनीं पुणें येथें १९२० सालीं स्थापन केली व आपल्या सतत उद्योगानें, चिकाटीनें व शिवणकलेंतील प्राविण्यानें नांवारूपास आणिली. सरकारी मान्यता मिळण्याचा पहिला मान १९३१ सालीं या संस्थेस मिळाला.

संस्थेचें उत्तम कार्य व प्रगति पाहुन मोठमोठ्या हिंदी संस्थानां-तून संस्थानची स्कॉलरशिप घेऊन विद्यार्थी या संस्थेंत शिक्षणास येतात. बऱ्याच संस्थानांकडून शिवणकलेबद्दल कांहीं उपक्रम करावयाचे वेळीं प्रि. जाधव यांचा सल्ला घेण्यांत येतो. या वर्षी श्रीमन्महाराज छत्रपती सरकार करवीर यांनीं संस्थेस उदार आश्रय दिला."

अध्यक्ष आपल्या भाषणांत म्हणाले:—" हल्लींचें युग जाहि-रातबाजीचें आहे परंतु पुष्कळ वेळां जाहिरातीनें जनतेची दिशा-भूल होते व मुख्य मुद्याची गोष्ट दृष्टीआड होते. खानदेशांतील खेड्याचा तुपवाला घरोघर फिरत असला तरी त्याचें साजूक तूप कोणी घेत नाहीं पण कृत्रिम तूप उत्तम लेबल असलेल्या डब्यां-तून विकलें तर तें जास्त किंमतीस खपतें ! श्री. यशवंतराव जाधव हे केवळ आपल्या ध्येयाकडे दृष्टी ठेवून, सतत त्याच कार्यांत गुंतलेले असतात. ह्या उत्तम कार्यास यापेक्षा जास्त प्रसिद्धीची जोड त्यांनीं द्यावी ". नंतर विद्यार्थ्यांस उद्देशून त्यांनीं चार उपदेशपर शब्द सांगितले व प्रशस्तिपत्रें दिलीं.


---

### चांभार विद्यार्थी मंडळाची वार्षिक सभा

वरील संस्थेची वार्षिक सभा गेल्या रविवारीं सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत भरली होती. नियोजित अध्यक्ष आम-दार सोनगांवकर प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आयत्या वेळीं न येऊं शकल्याकारणानें मंडळाचे कायमचे अध्यक्ष,प्रो. काळे, ह्यांनीं त्यांची जागा भरून काढली. चांभार समाजांतील आणि इतर स्त्रीपुरुष ह्यांनीं दिवाणखाना भरून गेला होता. ईशस्तवन, अह-वाल वाचन, अंदाजपत्रक व घटना-नियम ह्यांस मंजुरी इत्यादि कामें झाल्यावर साताराचे श्री. भाऊराव पाटील, ह्यांचें कळकळीचें भाषण झालें. चांभार वर्गाच्या हातून कातड्याचा धंदा चालला आहे, त्याचें रक्षण झालें पाहिजे आणि त्या वर्गाच्या तरुणांची प्रवृत्ति आपल्या धंद्याच्या शास्त्रीय सुधारणेकडे वळली पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. येथील ट्रेनिंग कॉलेजांतील श्री. चव्हाण ह्यांनीं, आपल्या जातीच्या लोकांत भलत्या सामाजिक व धार्मिक कल्पना पसरल्या आहेत, त्या दूर होण्याचें महत्व वक्तृत्वपूर्ण भाषेंत प्रतिपादलें. ह्यानंतर एका विद्यार्थ्याचें काव्यगायन झाल्या-वर अध्यक्षांचें भाषण झालें. देशाच्या आर्थिक उन्नतीच्या कार्यांत चांभार वर्गाच्या धंद्याचें किती महत्व आहे ह्याचें प्रो. काळे ह्यांनीं विवेचन केलें आणि त्याकरितां योग्य रीतीचें शिक्षण व संघटन ह्यांचें किती महत्व आहे, हें समजाऊन सांगितलें. चांभार विद्यार्थी मंडळाचें कार्य लहान प्रमाणावर असलें तरी तें पद्धतशीर व उत्साहानें चाललें आहे असें सांगून चांभार समाजानें त्यास अधिक सहाय द्यावें अशी कळकळीची सूचना त्यांनीं केली.अत्तर गुलाब व वंदेमातरम् गीत होऊन सभेचा कार्यक्रम संपला.







टिळक आयर्न ॲंड स्टील वर्क्स
[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात. ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर,

दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.
[ स्थापना सन १९३५ ]
९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर
कामाची वेळः—
दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १
चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.
सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.
मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.
कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.
मॅनेजिंग एजंटस्.

स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा
स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना कर-ण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४; किंवा प्रथम ६०८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इनव्हेस्टमेंटमध्यें रोख रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याचीं तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.
दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.
हेड ऑफिसः—गिरगाव, मुंबई.
ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) | १२०—० |
| ५% ( १९३९-४४ ) लोन | १०४-१४ |
| ४% १९४३ | १०८- ६ |
| ३½% बिनमुदत | ९८—४ |
| ३½% १९४७-५० | १०६—४ |
| २¾% १९४८-५२ | १००—४ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०९—८ |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३) | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | १२३—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) १०% | १४७—४ |
| बँक ऑफ बडोदा (१००—५०) १०% | ११८—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ६% | ३२—८ |
| इंपीरिअल बँक ( ५० ) १२% | १५७०—० |
| बॉंबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १२४—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४¾% | १०४—४ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) ४½% | ९६—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १०% व ६ रु. ४ आ. बोनस | ९२०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% | ७५५—० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% | ११७-१३ |
| कराची ( १०० ) ९% | २१५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | २१६—४ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३२०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १४२०—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | १५६—४ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. | ४७—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. | २१—० |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ४ आ. | ४१—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ७५ रु. बोनस | ४,४५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०३-१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. | ९६२—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. | २३८—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै | ९९०—० |

SAHYADRI INS. Co
NASIK
BEST TO CHOOSE & TO REPRESENT
WANTED WORKERS OF EITHER SEX.
Particulars by post or in person.

**माधवाश्रम**

**माधवाश्रम बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.**

हा आश्रम ट्रॅमच्या रस्त्यावर असून रेल्वे स्टेशन व चौपाटी सुमारें पांच मिनिटांवर आहे. जागा मध्यवस्तींत, हवाशीर व लागणारें फर्निचरनें श्रृंगारीत व व्यवस्थित खोल्या असून सरदार, श्रीमंत, विद्यार्थी, व्यापारी, वगैरे उच्च हिंदु लोकांस राहण्यास व भोजनाचे स्वच्छतेमुळें तसेंच इलेक्ट्रीक लाईट, पंखे ( फर्स्टक्लासमध्यें ) वगैरे सोयीमुळें जागा अत्यंत शोभिवंत जाहली आहे. कुटुंबासह राहाणारांची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

**S. B. JOSHI & Co.**

**ENGINEERS & CONTRACTORS**

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.

एरोग्राफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.

**स्त्रियांचा आजार**

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेतेः—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

**K. K. & Co.**
Photographic Dealers
POONA

जुन्या घरांची दुरुस्ती काळजीपूर्वक करून विक्री जाते.
भेटा अगर लिहा:—
**माऊ गंगाधर साठे**, केत्राटदार
चिमण्या गणपति, सदाशिव ५१२, पुणें.

पुण्यांत फक्त १ च
मनपसंत कपडे शिवून देणारें
**दि डेक्कन टेलरिंग फर्म**
डेक्कन जिमखाना, पुणें नं. ४.
नवीन कापडाचा जंगी स्टॉक.
चालक-एम. एन. पाटसकर, F. C. D. (London)

SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

पत्ता बदलला
**मराठी केन्द्र**
ही
१ जानेवारी १९३८ पासून
२९२, सदाशिव पेठ, ट्रेनिंग कॉलेजजवळ गेली आहे.

# एव्हर सिल्व्हर
वापरून
**कल्हईचा खर्च वांचवा.**
या धातूचीं भांडीं कळकत नाहींत व त्यांना सहज पोचे येत नाहींत आणि तीं दिसण्यांत फारच सुबक असतात.

सोलापुरांत मिळण्याचें ठिकाणः—
**दि टिकेकर टेक्स्टाईल मिलसचें दुकान.**
कसबा पेठ, मेन रोड, सोलापूर.

**ओगले ग्लास वर्क्स लि०**
पो. ओगलेवाडी,
सं. औंध. जि. सातारा.




पुणे एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें
अनुभाविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.
सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

## भारतीय अर्थशास्त्र
लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ५५०; किंमत पांच रुपये

प्रथमतः अर्थशास्त्राच्या सामान्य तत्त्वांचें विवेचन करून पुढें हिंदुस्थानाच्या सांपत्तिक व औद्योगिक परिस्थितीचा ह्या ग्रंथांत विस्तरशः विचार केलेला आहे. हिन्दी संस्कृति, राष्ट्रीय अर्थशास्त्र, शेतकीचा धंदा, मजुरांची चळवळ, हुंडणावळ, सहकारी चळवळ, संरक्षक धोरण, करपद्धति वगैरे सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचें सांगोपांग विवेचन केलेलें वाचकांस आढळेल.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गानिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.